---

*** प्र क र ण – 3 रे ***

---

## 'हुंदके' या संग्रहातील मृत्युलेखांचे स्वरुप आणि वैशिष्ट्ये :

'हुंदके' या मृत्युलेखसंग्रहात आचार्य अत्रे लिखित 76 मृत्युलेखांचा समावेश आहे. या मृत्युलेखांचे स्वरुप अग्रलेखांचे असल्याने विस्ताराच्या दृष्टीने आटोपशीर आहेत. हे लेखन जरी विविध क्षेत्रांतील विविध व्यक्तींवर झालेले असले तरीदेखील अत्र्यांच्या त्या त्या व्यक्तींच्या जीवनाशी व कार्याशी असणाऱ्या समरसतेमुळे हे लेखन उठावदार झाले आहे. ह्या मृत्युलेखांमधून अत्र्यांच्या प्रगल्भ, व्यासंगी, निर्भिड व चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टयपूर्ण अभिव्यक्ती झाली आहे. त्या दृष्टीने ह्या प्रकरणांत ' हुंदके ' ह्या मृत्युलेख संग्रहातील मृत्युलेखांचे स्वरुप, त्यास दिसून येणारे अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व लेखनशैलीचे पैलू यांचा परिक्षणत्मक व समीक्षणात्मक दृष्टिकोनातून विचार करावयाचा आहे.

'हुंदके ' संग्रहातील मृत्युलेखांमधून अत्र्यांच्या स्थिरावलेल्या पत्रकारीतेचे दर्शन घडते. तसेच स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृती विषयीचा अत्र्यांच्या मनातील रास्त अभिमान मृत्युलेखांच्या लेखनातूनही व्यक्त होताना दिसतो. निवर्तलेल्या व्यक्तीशी असणारा स्नेहभाव, वैयक्तिक परिचयाबरोबर अत्र्यांची मुरलेली ध्येयनिष्ठ पत्रकारिता ह्या लेखनात दिसते. हे लेखन चरित्रवर्णपर, माहितीपर, कथात्मक, स्वरुपाचे असून लेखनात घटनाप्राचुर्य व अनुभव कथनास विशेष महत्त्व आहे. जंत्रीवजा मजकूर कटाक्षाने टाळून व्यक्तीच्या जडणघडणीची पार्श्वभूमी व त्याबरोबरीने व्यक्मिमत्त्व दर्शन अशा स्वरुपाचे हे लेखन झाले आहे. हे लेखन जरी काहीसे त्रोटकपणे झाले असले तरी ते वृत्तपत्रीय लेखनाच्या मर्यादेमुळे तसे झाले आहे. अन्यथा व्यक्तीचे जीवनदर्शन, व्यक्तिमत्त्वदर्शन, मूल्यमापन यादृष्टीने यथोचितच झाले आहे. निवर्तलेली व्यक्ती केवळ जंत्रीवजा पद्धतीने उभी करणारे हे लेखन नाही तर व्यक्तीचे व्यक्ती म्हणून वेगळेपण, कार्यक्षेत्र, समाजावरील त्या व्यक्तीचा प्रभाव, स्वतःवरील प्रभाव, वैयक्तिक स्नेहभाव ह्या अंगाने मृत्युलेखांचे लेखन झाल्याने हे लेखन जरी प्रसंगोपात् झाले असले तरी त्याचे स्वरुप मात्र वाड्.मयीन आहे.

अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने मृत्युलेखांचे व्यक्तीनिहाय वर्गीकरण करणे सोईस्कर ठरेल. ही

वर्गवारी पुढीलप्रमाणे –

'हुंदके' ह्या मृत्युलेखसंग्रहात समाविष्ट करण्यात आलेले एकूण मृत्युलेख – 76.

1. सामान्य व्यक्तींवरील मृत्युलेख. –02
2. नैसर्गिक आपत्तीस श्रद्धांजली – 02
3. कथासदृश मृत्युलेख. 02
4. शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना आदरांजली 13.
5. विद्वान व व्यासंगी व्यक्तिमत्वांबद्दल आदरांजली. 09
6. वृत्तपत्रक्षेत्राशी संबंधित व्यक्तींवरील मृत्युलेख – 06
7. वाड्.मयीन क्षेत्रातील व्यक्तींना श्रद्धांजली – 06
8. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख. – 10
9. सामाजिक प्रतिष्ठित व विचारवंतांवरील मृत्युलेख. – 13.
10. सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख – 10.
11. धार्मिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तींवरील मृत्युलेख – 03

हे सर्व मृत्युलेख म्हणजे अत्र्यांच्या मनातील त्या त्या व्यक्तीविषयीचा भावोत्कट कल्लोळ होय. तत्कालीन भावनातिरेकातून हे लेखन झाले असल्याने त्यात साहजिकच झपाटलेपण आले आहे. काही मृत्युलेखांमधून तर अक्षरशः अत्र्यांच्या अंतःकरणातील उर्मी दाटून येताना दिसते. त्या मृत्युलेखांच्या लेखनावेळी अत्र्यांच्या संवेदनशील मनाने 'हुंदके' देऊन आसवे गाळली आहेत.

*** अत्रे लिखित पहिला मृत्युलेख –**

गो. म. चिपळूणकर : काही आठवणी' हा अत्र्यांनी लिहिलेला पहिला मृत्युलेख 'मनोरमा' मासिकामधून दि. 10 जाने. 1930 रोजी प्रसिद्ध झाला. त्या लेखाचे स्वरुप पूर्णपणे आठवणी सांगण्याचे आहे. त्यांच्या जीवनातील साध्या साध्या प्रसंगामधून त्यांच्या स्वभावाच्या भावच्छटा व्यक्त केल्या आहेत. – त्या ओघाने काही गमतीजमतीही ते सांगून जातात. शैक्षणिक क्षेत्राशी संबंधीत व्यक्तीवरील हा लेख असून अत्र्यांनी लिहिलेला पहिला मृत्युलेख म्हणून हा मृत्युलेख ध्यानात घ्यावयास हवा.

**1) सामान्य व्यक्तींवरील लेख –**

अत्र्यांच्या मनातील सामान्य व्यक्तींबद्दलचा स्नेहभाव 'माझा बाबू गेला' आणि 'कै. एकनाथ

यादव निफाडकर' ह्या दोन मृत्युलेखांमधून व्यक्त होतो. त्यांनी फक्त समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींवरच मृत्युलेख लिहिले असे नाही. तर आपल्या गाडीच्या सामान्य ड्रायव्हरपासून ते आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या कित्येक असामान्य, मान्यवर व्यक्तींवर मृत्युलेख लिहिले. हे त्यांच्या मृत्युलेख लेखनाचे खास वैशिष्टय होय. सामान्य व्यक्तीचे जीवनदेखील अत्र्यांना मृत्युलेख लेखनास प्रेरक व समर्पक वाटले. 'माझा बाबू गेला' हा अत्र्यांनी आपल्या गाडीच्या ड्रायव्हरवर लिहिलेला मृत्युलेख वैशिष्टयपूर्ण आहे. मनुष्य संगतीमुळे अधिक समजतो याचे हे उत्तम उदाहरण होय. आपल्या वैशिष्टयपूर्ण शैलीत एका सामान्य व्यक्तीचे असामान्य रुप त्यांनी उभे केले आहे. अत्र्यांच्या कृतज्ञ स्वभावाचे व संवेदनशील मनाचे हे प्रतिबिंब होय. येथे 'बाबू' अत्र्यांचा फक्त ड्रायव्हर रहात नाही तर तो त्यांच्या जिव्हाळयाचा विषय बनतो. जगाच्या दृष्टीने सामान्य मनुष्याचे निरर्थक जीवनही अर्थपूर्ण रीतीने बोलके करण्याचे सामार्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. 'कै. एकनाथ यादव निफाडकर' ह्या विक्षिप्त व्यक्तिमत्त्वावरील मृत्युलेखातून मानवी स्वभावाचा विचित्र नमुना त्यांनी यशस्वीपणे उभा केला आहे. एका अर्थाने हे निफाडकरांचे स्वभावचित्रण असून संक्षिप्त जीवनचरित्रही आहे. कोणत्याही व्यसनाच्या आहारी न जाता केवळ विक्षिप्त स्वभावामुळे लक्षवधी रुपयांची बापकमाई वाङ्‌मयाच्या आणि लेखनाच्या विचित्र नादापायी फुंकुन कफल्लक झालेले हे व्यक्तिमत्त्व अत्र्यांच्या लेखणीला विलक्षण भावले असून निफाडकरांच्या कफल्लक जीवनाचा विवेचक शोध घेऊन ते वाचकांना बोध देतात. निफाडकरांसारख्या कफल्लक माणसाच्या जीवनातही त्यांना जीवनार्थ गवसतो.

ह्या दोन्ही मृत्युलेखांमधून अत्र्यांच्या मनातील सामान्य व्यक्तींबद्दल स्नेहभावाच्या भूमिकेतून व्यक्त होणारा तरल स्नेहार्द्रतेचा ओलावा प्रत्ययास येतो. सामान्य व्यक्तींवरही यशस्वी मृत्युलेख लिहिण्याचे त्यांचे कसब वैशिष्टयपूर्ण आहे. त्यांचे आपल्या अवतीभोवतीचे निरीक्षण किती सूक्ष्म होते व त्यांचे मन किती संवेदनशील होते याची येथे कल्पना येते.

**2) नैसर्गिक आपत्तीस श्रद्धांजली –**

'हुंदके' मधील सर्वच मृत्युलेख वर्तमानपत्रासाठी अग्रलेख म्हणून लिहिले गेले असल्याने तत्कालीन घटनांच्या अनुषंगाने हे लेखन झाले आहे. त्यामुळे त्यात अत्र्यांच्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचे व परखड पत्रकारितेचे ठसे उमटलेले दिसतात. 'त्या अर्ध्या तिकिटासाठी' आणि 'पानशेत हुतात्मांना सामुदायिक श्रद्धांजली' ह्या दोन नैसर्गिक आपत्तीस श्रद्धांजलीच्या मृत्युलेखात करुणरम्य सौंदर्यांचा व परखड वक्तव्याचा प्रत्यय येतो. हे दोन्ही मृत्युलेख जलप्रलयाशी निगडीत

असून दोन्ही लेखांच्या अभिव्यक्तीत मात्र फरक आहे. 'त्या अर्ध्या तिकिटासाठी' ह्या मृत्युलेखात अत्र्यांच्या मनातील भावविवशतेचे व उद्विग्नतेचे प्रत्यंतर येते. मुंबईपासून अवघ्या दहा अकरा मैलाच्या अंतरावर 'रामदास' बोट अकस्मात बुडून तिच्यातील सहाशेहून अधिक प्रवाशांना जलसमाधी मिळाल्याच्या कारुण्यपूर्ण घटनेचा अत्र्यांच्या संवेदनशील, हळव्या मनावर झालेला हा करुणोदात्त परिणाम होय. त्यांची भावविवशता इतकी शिगेला पोहचली आहे की, त्या ओघात कित्येक शोकात्म सुभाषितांची स्वाभाविकपणे निर्मिती झाली आहे, ह्या घटनेविषयी ते सहजपणे म्हणतात, " शोकजनक गोष्टी अचानक घडून येतात, म्हणूनच आपल्या हृदयावर दुःखाचा असह्य आघात होतो."[1] तसेच ह्या अपघातात मृत्यूने अनेकांचे बळी घेतले म्हणून ते मृत्यूविषयी म्हणतात. " अनेकांची मरणे अनुभवूनही मृत्यूच्या अंगात तिळमात्रही धैर्य किंवा शौर्य निर्माण झालेले नाही. उलट तो जास्तच भ्याड आणि दुष्ट झालेला आहे."[2] अत्रे येथे कमालीचे दैववादी होऊन नियतीला दोष देतात. लेखाची भाषाशैली करुणरम्य असून त्यांच्या मनातील प्रासंगिक उत्कटता व सळसळते कारुण्य यांचे मनोज्ञ दर्शन घडते. अपघातग्रस्त बोटीची सातशे साडेबेचाळीस तिकिटे खपली होती. तेंव्हा त्या उतारुंपैकी अर्धे तिकिटं घेणारे ते चिमुकले बालक वाचणे शक्यच नाही म्हणून ते गहिवरुन' त्या अर्ध्या तिकिटासाठी मला रडू द्या' असे म्हणतात. पराकोटीच्या कारुण्यामुळे हा लेख अंतःकरणाचा ठाव घेतो. अत्रे साक्षात काळपुरुषाशी एकतर्फी संवाद करतात. अकल्पित घटनेवरील हे भाष्य असून अत्र्यांच्या करुणरम्य शैलीच्या स्पर्शामुळे ही अपघाताची घटनाही वाङ्.मयीन मूल्यास पात्र झाली आहे.

'पानशेत हुतात्म्यांना सामुदायिक श्रद्धांजली' हा लेख म्हणजे दि. 12 जुलै 1962 च्या जलप्रलयात वाहून गेलेल्या हुतात्म्यांना 20 जुलै 1962 रोजी अत्र्यांनी शोकसभेत वाहिलेली श्रद्धांजली आहे. ह्या मृत्युलेखास वक्तृत्वाची छटा असून ह्या मानवनिर्मित आपत्तीस जबाबदार असणा—या प्रवृत्तीविषयी ते रोखठोक वक्तव्य करतात. ही आपत्ती ओढवून घेणा—या शासनावर ते सडेतोडपणे ताशेरे ओढतात. बेजबाबदार अधिका—यांबद्दल बोलताना अत्र्यांची भाषा प्रक्षोभक व धारदार होते. ह्या लेखातून अत्र्यांचे पानशेत आपत्ती संबंधीचे विचार, मते व अनुभव व्यक्त होतात.

ह्या दोन्ही सामुदायिक श्रद्धांजलीच्या लेखांमधून अत्र्यांच्या मनातील भावविवशते बरोबरच निर्भिड व परखड वक्तव्याचे दर्शन घडते.

**3) कथासदृश मृत्युलेख –**

'महापुरात बुडालेला विष्णू 'आणि' 'वसंत मालती' ह्या दोन मृत्युलेखांचे स्वरुप कथासदृश आहे. हे लेख मृत्युलेख म्हणून जसे आस्वादता येतात तसे 'कथा' म्हणूनही आस्वादता

येतात. 'कथात्मकता' हे या लेखांचे वैशिष्टय असून त्यांचे लेखनदेखील एखादी कथा वाटावी असेच आहे. 'महापुरात बुडालेला विष्णू' ह्या लेखामध्ये अत्रे भावविवशपणे विष्णू महापुरात कशा प्रकारे वाहून गेला याचे कथन करतात. कथेमध्ये जशी स्थलवर्णने येतात तशी स्थलवर्णने, प्रसंगवर्णने येथे येतात. विष्णूचे स्वभावचित्रणही येते. आशयाच्या सूक्ष्मपणाबरोबर चित्रमयताही आली आहे. भाषा अंतःकरणाला भिडणारी असून हा लेख अंती करूण्याचा परमोत्कर्ष गाठतो व वाचकांच्या मनाला हुरहूर लावून जातो. विष्णू ब्रह्मेसारख्या जगाच्या दृष्टीने सामान्य असणा--या व्यक्तीवरील हा मृत्युलेख त्याच्यातील कथात्मकतेमुळे कथासदृश्य वाटतो.

'वसंत मालती' यांची हृदयद्रावक प्रेमकथाही अत्र्यांनी अत्यंत आस्थेवाईकपणे सांगितली आहे. 'मालती' च्या मृत्यूनंतर लिहिलेला हा मृत्युलेख एखादी कथा वाटावी असाच आहे. तसे पाहिले तर

वसंत व मालती ह्या अत्र्यांना ज्ञात असलेल्या सामान्य व्यक्ती. पण त्या सामान्य व्यक्तींच्या जीवनातील सामान्य प्रसंगांचीच कौशल्यपूर्ण मांडणी केली आहे. वसंत लोटलीकर व मासिक मनोरंजनचे संपादक का. र. मित्र यांची कन्या मालती यांच्या प्रेमाच्या शोकांतिकेचे हे इत्यंभूत वर्णन आहे. हे वर्णन करताना अत्र्यांची भूमिका कथा निवेदन करण्या--याची वाटते. प्रसंग, भावानुभूती व घटना यांच्यामुळे लेखास स्वाभाविकपणे कथात्मक घाट प्राप्त झाला आहे. अनुभवकथन व आठवणींच्या माध्यमातून वसंतमालतीच्या आयुष्याची हृदयद्रावक शोकांतिका अत्र्यांनी सांगितली आहे.

सामान्य व्यक्तींचे जीवनदेखील जेव्हा अत्र्यांच्या लेखणीतून वाचकांसमोर येते तेंव्हा त्या सामान्यत्वातही असामान्य जीवनार्थ जाणवतो आणि सळसळत्या कारुण्याचा प्रत्यय येतो. हे मृत्युलेख असूनही अंतःकरण हेलावण्या--या कथा देखील होतात.

**4) शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना आदरांजली –**

अत्र्यांनी लिहिलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांचे स्वरुप वैविध्यपूर्ण आहे. काही लेख आठवणींस प्राधान्य देऊन लिहिले आहेत. काही लेखांमधून त्या व्यक्तीच्या शैक्षणिक कार्याचा व जीवनाचा आढावा घेतला आहे. तर काही लेखांचे स्वरुप शब्द चित्रात्मक, स्वभावचित्राचे आहे. बहुतेक लेखांमधून अत्र्यांची विद्वत्ता व व्यासंगासमोर नतमस्तक होण्याची वृत्ती दिसते व वैयक्तिक स्नेहभावही व्यक्त होतो.

(अ) **आठवणींस प्राधान्य असणारे मृत्युलेख –**

'गो.म. चिपळूणकर : काही आठवणी,' 'प्रा. रा. कृ लागू', 'प्रा. ना. ग. नारळकर', 'प्रा. वासुदेव गोविंद मायदेव,' हे मृत्युलेख त्या त्या व्यक्तींच्या जीवनातील आठवणींना प्राधान्य देऊन लिहिले आहेत. त्या आठवणींमधूनच व्यक्तीच्या स्वभावाचेही ते दर्शन घडवतात. चिपळूणकरांचा विसरभोळेपणा, विनोदी व गंभीर स्वभाव, गमतीजमती, सांगून त्यांच्या स्वभावातील गुणदोषांचेही चित्रण आले आहे. 'प्रा. रा. कृ. लागू' च्या जीवनातील बरेचसे किस्से सांगून त्यांच्या लाज–या बुज–या, भिडस्त, प्रसिद्धी पराङ्.मुख, अलिप्त, लहरी व हेकेखोर स्वभावाचे दर्शन घडवले आहे. लेखाचे स्वरुप आठवणींचे असले तरी लागूंबद्दलचा भावनिक ओलावाही व्यक्त झाला आहे. 'प्रा. ना. ग. नारळकर' यांच्यावरील मृत्युलेखातही काही वेचक प्रसंगाच्या व आठवणींच्या अनुषंगाने त्यांच्या जीवनकार्यावर भाष्य केले आहे. त्यांचे तेजस्वी वक्तृत्व, स्वभावातील सरळपणा, गोडवा, नम्रता, सभ्यता, विद्यार्थीप्रियता, इ. स्वभाव वैशिष्टयांवर भाष्य केले आहे. साध्याच शब्दांना प्रवाहीपणा प्राप्त झाला असून कमालीचे आत्मभान ठेवून अत्र्यांनी नारळकरांचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे.

अत्र्यांचे शिक्षणक्षेत्रातीलच एक स्नेही प्रा. वासुदेव गोविंद मायदेव यांच्यावरील 'मायदेव' ह्या मृत्युलेखात अत्र्यांच्या भावविवशतेचे प्रत्यंतर येते. मायदेवांच्या व्यक्तिमत्त्वातील काव्यात्मता अत्र्यांना कमालीची भावली आहे.

एकंदरीत आठवणींस प्राधान्य देऊन लिहिलेल्या शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांनी आठवणींच्या माध्यमातून त्या त्या व्यक्तिमत्त्वांचा परिचय करुन दिला आहे. हे लेखन जरी आठवणींच्या स्वरुपात झाले असले तरी त्या फक्त आठवणी राहात नाहीत तर त्यातून व्यक्ती उभी करणे हाच अत्र्यांचा प्रधान उद्देश आहे.

**(ब) कार्याचा अकृत्रिम जीवनव्यापी आढावा (चरित्रवर्णनपर)**

आठवणींच्या माध्यमातून ज्याप्रमाणे अत्र्यांनी व्यक्तींच्या कार्यावर व व्यक्तिमत्त्वावर भाष्य केले आहे. त्याचप्रमाणे काही व्यक्तींच्या कार्याचा अकृत्रिमपणे जीवनव्यापी आढावाही घेतला आहे. अर्थात हा आढावा घेत असताना काही आठवणीही स्वाभाविकपणे येतातच पण त्यांचे स्वरुप केवळ आठवणींचे नाही तर एकूणच व्यक्तीबद्दलचा स्नेहभाव, कार्याचा जीवनव्यापी आढावा, कार्याचे मूल्यमापन, जीवनाचा विवेचक शोध, वैचारिक विकास व्यक्तिमत्त्व दर्शन असे ह्या लेखांचे स्वरुप आहे. या अनुषंगाने लेखन चरित्रवर्णनपर झाले आहे. त्यात व्यक्तीबद्दलचा अत्र्यांच्या मनातील सख्यभाव, आस्थेवाईकताही व्यक्त होते.

'बाळासाहेब खर्डेकर' यांच्यावरील मृत्युलेख म्हणजे अत्र्यांच्या व्यक्तिगत अनूभूतीचा भावोत्कट उद्‌गार आहे. लेखाच्या आरंभीच आपल्या मनातील भावविवशता व्यक्त करुन त्यांनी बाळासाहेब खर्डेकरांच्या शिक्षण क्षेत्रातील अग्रणी कामगिरीवर व त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर भाष्य केले आहे. त्यांचे अभूतपूर्व, बुद्धिवादी, खिलाडू व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व अत्र्यांना त्यांच्याशी असणाऱ्या स्नेहभावामुळे अधिकच भावले आहे. स्नेहभावामुळे लेखास भावगांभीर्यही प्राप्त झाले आहे. 'आचार्य दादासाहेब दोंदे' यांच्यावरील मृत्युलेख चरित्रवर्णनपर असून भावपूर्णतेने लिहिलेला आहे. दोदयांचे हे संक्षिप्त चरित्र होय. त्यांच्या भावजीवनावर प्रकाश टाकत असतानाच त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे मूल्यमापनही केले आहे. अत्र्यांनी दोदयांच्या व्यक्तिमत्त्वाबद्‌दलची निष्ठा जशी व्यक्त केली आहे तसेच त्यांच्या पक्षाशी असणारे आपले मतभेदही प्रांजळपणे व्यक्त केले आहेत. त्यामुळे अत्र्यांच्या राजकीय मतप्रणालीचेही येथे दर्शनघडते. दादासाहेबांच्या शैक्षणिक, राजकीय व कौटुंबिक जीवनाचा हा अकृत्रिम आढावा आहे.

'कै. प्रि. एम. पी. व्यास' यांच्यावरील लेखात त्यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या नवनवीन प्रयोगशील उपक्रमांचा आढावा घेऊन त्यांच्या स्वभावाचे व व्यक्तिमत्त्वाचे काव्यमय वर्णन केले आहे. "नम्रता, प्रसन्नता आणि सौम्यता ह्यांचे अत्यंत आकर्षक तेज त्यांच्या गौरमुखावर पोर्णिमेच्या चांदण्यासारखे पसरलेले असे."[3] अशा शब्दात ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठया रसिकतेने वर्णन करतात. त्यांच्या प्रखर ज्ञाननिष्ठे बद्‌दलचा नितांत आदर शब्दाशब्दातून व्यक्त झाला आहे. 'सोनोपंताचा वैकुंठवास' ह्या मामासाहेब दांडेकर यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांनी मामांच्या विलोभनीय व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या पांढऱ्या शुभ्र कपड्यांपासून ते त्यांच्यातील चिकित्सक संशोधकापर्यंत त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील खास बाबींचा उल्लेख करताना त्यांच्या वैचारिक व वाङ्‌मयीन विकासावरही भाष्य करतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्याचे बारकावे अत्र्यांनी टिपले आहेत. त्यांच्या ज्ञानेश्वरी संपादनाविषयी ते म्हणतात, "हे केवळ साहित्यिक कार्य नव्हते ;, हे धर्मकार्य होते. हे देवकार्य होते."[4] या एकाच विधानावरुन त्यांच्या कार्याचे अत्र्यांनी केलेले यथोचित मूल्यमापन ध्यानात येते.

'महाराष्ट्राच्या कर्मवीरांना श्रद्धांजली' ह्या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील मृत्युलेखातून अत्र्यांनी अण्णांचे बहुजन समाजाच्या उद्धारासाठी भरलेले व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. त्यांच्या जीवनातील विविध स्तरांवर भाष्य करुन त्यांच्या कार्याचा ते विवेचक शोध घेतात. या लेखात भावविवशतेपेक्षा अण्णांच्या कर्तृत्वदर्शनावरच अधिक भर असून नेटक्या अनुभवांची वैशिष्ट्यपूर्ण अभिव्यक्ती झाली आहे.

शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींवरील चरित्रवर्णनपर मृत्युलेखांमध्ये अत्र्यांनी त्या त्या व्यक्तींच्या शिक्षण कार्यातील आढावा घेत असताना त्या व्यक्तीचाही जीवनव्यापी आढावा घेतला आहे. तसेच बहुतांशी व्यक्तींशी अत्र्यांची भावनिक जवळीक असल्याने भावनेच्या स्पर्शामुळे त्यास भावनिकतेचा ओलावा प्राप्त झाला आहे. त्यामुळे हे मृत्युलेख म्हणजे केवळ व्यक्तींच्या कार्याची जंत्री होत नाही.त किंबहुना ही नुसती व्यक्ती वर्णनेही राहात नाहीत तर व्यक्तीच्या सामाजिकतेचे व कौटुंबिकतेचेही प्रतिबिंब त्यात पडते. व्यक्तीला तिच्या कार्यामुळेच अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असले तरी अत्रे केवळ व्यक्तीच्या कार्यालाही महत्त्व देत नाहीत तर व्यक्तीच्या कार्याबरोबर ते तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या खोलीला हात घालतात व त्यात आपल्या व्यक्तिमत्त्वाचेही स्वाभाविक रंग मिसळतात. त्यामुळे मृत्युलेखांमधून त्या व्यक्तीचे दर्शन तर होतेच होते पण त्याबरोबरीने अत्र्यांच्या विचारांचे, चिंतनशीलतेचे, शैलीचे व समकालीन विचारप्रणालींचेही दर्शन घडते.

**क)** स्वभावचित्रणपर व व्यक्तित्त्वदर्शनावर भर असणारे मृत्युलेख - शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित काही व्यक्तींच्या मृत्युलेखांचे लेखन व्यक्तिचित्रणाच्या जवळ जाणारे झाले आहे. त्यामुळे त्यामध्ये आठवणी व कार्य यापेक्षा स्वभावचित्रण, व्यक्तित्त्वदर्शन व व्यक्तिमत्त्वाची वैशिष्टये यावर अधिक भाष्य झाले आहे.

'कृ. पां. कुलकर्णी' यांच्यावरील 'नाना गेले' ह्या लेखातून अत्र्यांनी कृ. पां. चे स्वभावचित्रण व व्यक्तिमत्त्वदर्शन वैशिष्टयपूर्ण शैलीत केले आहे. अत्रे कृ. पां. ना. स्नेहाने नाना म्हणत. नानांबद्दलच्या अपरिमित आत्मीयतेच्या भावनेने हा लेख लिहिला आहे. नानांशी असणाऱ्या चाळीस वर्षाच्या स्नेहानंतर नानांच्या निधनाबद्दल अत्रे म्हणतात, " अखेर आमचे नाना गेले ! चाळीस वर्षाच्या स्नेहाचा अगदी मणकाच तुटला."[5] कमालीच्या हळवेपणाने व संवेदनशीलतेने अत्रे नानांच्या निधनाबद्दलची हळहळ व्यक्त करताना कमालीचे दैववादी होतात. नानांशी आपले असणारे संबंध म्हणजे काहीतरी पूर्वजन्मीचा ऋणानुबंध असावा असे त्यांना वाटते. "तसे पाहिले तर कोणत्याही गोष्टीत त्यांच्या नि माझ्यामध्ये सारखेपणा नव्हता. न आहारात, न विहारात न आचारात, न विचारात, न पोशाखात, न स्वभावात. पण असे असूनही आमचा स्नेह एवढा दाट की लोकांना अचंबा वाटायचा......... मनाचा असा ममताळू हाडाचा कनवाळू नि भावनेचा श्रद्धाळू माणूस सहसा क्वचितच आढळतो"[6] या क्रमकबद्ध वर्णनावरुन अत्र्यांच्या व नानांच्या घनिष्ट स्नेहभावाची कल्पना येते. लेखाचे स्वरुप कौटुंबिक जिव्हाळयाचे असून नानांच्या कौटुंबिक, सामाजिक व वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. अत्रे नानांशी कमालीचे एकरुप झाल्याने या लेखास स्नेहार्द्रतेचा ओलावा

प्राप्त होऊन जागोजागी भावनिक स्पर्शही झाला आहे.

'महाराष्ट्राचे रँग्लर गेले' हा रँग्लर परांजपे यांच्यावरील लेख म्हणजे अत्र्यांच्या रँ. परांजपांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रदीर्घ चिंतनाचा परिपाक होय. ते रँ. परांजप्यांचे शिष्यत्व अभिमानाने मिरवताना म्हणतात, " आमची राजकीय निष्ठा लोकमान्य टिळकांच्या चरणी वाहिलेली होती, पण आमच्या शैक्षणिक आणि सामाजिक निष्ठा मात्र अप्पांच्या चरणी समर्पीत होत्या. अप्पासाहेबांच्या आवडत्या गणित विषयाच्या भाषेतच बोलायचे तर, आम्हाला त्यांच्याविषयी वाटणारा परम आदर आणि त्यांना आमच्या विषयी वाटणारी आपुलकी यांना केवळ बेरजेचे नि गुणकाराचेच नियम लागू होते."[7] अशा प्रकारे अप्पांच्या महनीय व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असताना जागोजागी कृतार्थतेची जाणीव व्यक्त होते. लेखाची भाषा काव्यमय व उठावदार असून तिला आगळे तेज प्राप्त झाले आहे. हा मृत्युलेख म्हणजे रँग्लर परांजप्यांचे स्वभावचित्र होय.

'पुरुषोत्तम रामचंद्र लेले' हा पु. रा. लेले यांच्यावरील मृत्युलेख अत्र्यांनी अत्यंत स्पष्टवक्तेपणे लिहिला आहे. हा लेख शिक्षण क्षेत्रातील व्यक्तीवर असला तरी बराचसा भाग लेल्यांच्या विक्षिप्त स्वभावाचे दाखले देण्यावरच खर्ची पडला आहे. त्यांच्याशी असणा-या मतभेदांचे अत्रे प्रांजळपणे वर्णन करतात व त्यांच्या फटकळ दुराग्रही हेकेखोरपणावर घणाघाती प्रहारही करतात. मात्र शेवटी त्यांच्याबद्दलचा आदरही व्यक्त करतात. 'गुरुदेव रानडे' यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांचे विद्वत्तेसमोर नतमस्तक होणारे व्यक्तिमत्त्व दिसून येते. त्यांच्या व्यासंगी, अध्यात्मवादी, गूढवादी व साक्षात्कारी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. गुरुदेवांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अत्र्यांना नितांत आदर आहे. त्यांच्या जीवनाचा हा विवेचक शोध असून त्यांच्या प्राध्यापकी व्यक्तिमत्त्वापेक्षा त्यांचे तत्त्वज्ञ व्यक्तिमत्त्व अत्र्यांना अधिक भावले आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील सर्वच मृत्युलेखांस अत्र्यांचा स्वभावस्पर्श व शैलीचा स्पर्श आहे. अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विद्वत्तेनुसार नतमस्तक होण्याची वृत्ती, चिंतनशीलता, गुणग्राहकता, कठोर टीकाकार, स्नेहभाव या पैलूंचे दर्शन लेखनात होते. अत्र्यांची गुरुनिष्ठा, आदरभाव, त्यांचे शिक्षकी व्यक्तिमत्त्व, तत्त्वनिष्ठा, रोखठोकपणा, याबरोबर व्यक्तीच्या जीवनाचा विवेचक शोध, वैचारिक विकास, कार्याचे मूल्यमापन, व्यक्तित्त्वदर्शन, स्वभावदर्शन, समकालीन विचारप्रणाली, भावोत्कटता, स्नेहभाव यांचे दर्शन घडते.

### 5) विद्वान व व्यासंगी व्यक्तींवरील मृत्युलेख –

विद्वान, व्यासंगी व संशोधक व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांचे व्यासंगी, रसिक, बहुश्रुत, प्रगल्भ, व्यक्तिमत्त्व दिसून येते. त्याचप्रमाणे राजकीय मतप्रणालींचे, व्यक्तीबद्दलच्या वैयक्तिक

जीवनातील महत्त्वपूर्ण बाबींचेही दर्शन घडते. त्याचबरोबर अत्र्यांची विद्वत्तापूजकवृत्ती, भावनिकता यांचेही प्रत्यंतर येते. त्यांचा मृत्युलेख लेखनात व्यक्तीचे वेगळेपण सांगण्यावर भर दिसतो. व्यक्तींचे वेगळेपण अत्रे वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने नमूद करतात, 'पुरुषोत्तम मंगेश लाड' ह्या महाराष्ट्राला अपरिचित असणाऱ्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचा काव्यात्म परिचय करुन देताना त्यांच्या अभिजात परंपराप्रिय व्यक्तिमत्त्वाबद्दल ते म्हणतात, " त्यांचे भौतिक व्यवहार जरी आधुनिक जगात चाललेले होते तरी मनाने ते कालिदासाच्या आणि ज्ञानेश्वरांच्या सृष्टीतच वावरत होते. मराठी भाषेचा, साहित्याचा आणि संस्कृतिचा जाज्वल्य अभिमान लाडांच्या जीवनातून ओसंडत असे."[8] अशा प्रकारे व्यक्तीच्या व्यासंगी व्यक्तिमत्त्वावर भर देत तिच्या जीवनातील काव्यात्म दृष्टिकोनाचाही शोध घेताना दिसतात. अत्र्यांच्या आंतरिक जिव्हाळयाच्या शैलीचा स्पर्श मात्र या मृत्युलेखांस आहे. प्रसिद्ध इतिहासकार 'त्र्यंबक शंकर शेजवलकर' हे व्यक्तिमत्त्व त्यांच्या स्वभावातील गुणदोषांसह अत्र्यांनी उभे केले आहे. भाषेला संवादाची छटा असून बऱ्याच वेळा ते लिहित नसून बोलत असल्याची जाणीव होते. शेजवलकरांच्या व्यासंगाचे ते जसे अभिमानास्पद कौतुक करतात तसेच त्यांच्यावर वास्तववादी टीकाही करतात. त्यांच्यातील इतिहास संशोधकांची ते जेवढी तोंडभर स्तुती करतात तेवढीच त्यांच्या स्त्रीलंपटपणाबद्दल निंदानालस्तीही करतात. हा कमालीचा सडेतोडपणा त्यांच्याजवळ आहे. 'वृत्तपत्रांचे इतिहासकर्ते' या इतिहासतज्ज्ञ वि. कृ. जोशी यांच्यावरील मृत्युलेखात त्यांच्या विद्यासंपन्न, बहुश्रुत नि अभ्यासू व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना अत्र्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीचे व भावनिक जवळीकतेचे एकत्रित प्रत्यंतर येते. 'महापंडित सांस्कृत्यायन' या राहूल सांस्कृत्यायन यांच्यावरील मृत्युलेखात त्यांच्या विद्वत्तेबद्दल व्यासंगाबद्दल व ज्ञानलालसेच्या तळमळीबद्दल अत्र्यांनी नितांत आदर व्यक्त केला आहे. तसेच 'वेदमूर्ती सातवळेकरांच्या संशोधक, विद्वत्तेचेही ते तोंडभर कौतुक करतात. सातवळेकरांवरील मृत्युलेखात ते भावनिकतेपेक्षा वैचारिकतेकडे जास्त झुकतात. व्यक्तीच्या महनीयतेला ते विशेषणे लाऊ लागले की, देहभान विसरुन विशेषणे लावतात तरी कोठेही कृत्रिमता जाणवत नाही. अत्र्यांचे सातवळेकरांच्या वेदाभ्यासाबद्दलचे गहन चिंतन अनुभवास येते. ते विवेचन करताना साधार विवेचन करतात. कोठेही पोकळपणा दिसत नाही. 'कोशकार कर्वे' या चिंतोपंत कर्वे यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांच्या मनातील उत्कट कारुण्यभावाचे व भावविवशतेचे प्रत्यंतर येते. तसेच 'डॉ. रघुवीर' यांच्यावरील मृत्युलेखात त्यांच्या हिंदी भाषेच्या जाज्वल्य अभिमानावर व कोश कार्यातील महत्त्वपूर्ण सहयोगावर भर दिला आहे. 'कै. नानासाहेब चापेकर' यांच्या राजकीय, सामाजिक, व वाङ्मयीन संस्कारांचा त्यांनी अभिमानास्पद उल्लेख केला आहे.

'मुमुक्षु साहित्यिकाचा वैकुंठवास' ह्या ल. रा. पांगारकरांवरील मृत्युलेखात अत्र्यांच्या विद्वत्तापूजकतेचे स्पष्ट प्रतिबिंब पडले आहे. अत्रे स्वतःच व्यासंगी असल्यामुळे त्यांना विद्वजनांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल नितांत आदर आहे. ते पांगारकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी दर्शन तर घडवतातच त्याबरोबर त्यांच्या वाङ्.मयीन कामगिरीचेही यथोचित मूल्यमापन करतात. त्यांच्या लेखनशैलीच्या वाङ्.मयीन वैशिष्ट्यांबरोबर त्यांच्या वाणीचेही विशेष ते सांगतात. पांगारकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलचा अत्र्यांचा सूक्ष्म अभ्यास येथे दिसून येतो. प्रवचन करताना ते देहभान विसरुन कसे रंगत हे अत्रे चित्रमय शैलीत साक्षीदाराच्या भूमिकेतून सांगतात. त्यांची चिकित्सक व मार्मिक लेखणी, प्रासादिक वाणी, भाविक स्वभाव अशा व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यांबरोबरच त्यांच्या शरीरप्रकृतीचे व पोषाखाचे ढंगदार वर्णनही ते करतात. पांगारकरांच्या व्यक्तिमत्त्वाची ही वैशिष्टपूर्ण अभिव्यक्ती आहे. अनेक विशेषणे योजून अत्रे पांगारकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय दर्शन घडवतात. भाषा अलंकारिक व प्रासादिक असून अत्र्यांच्या व्यासंगाचेही प्रत्यंतर येते.

विद्वान व्यासंगी व संशोधक यांच्यावरील मृत्युलेखांमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्व दर्शनाबरोबर अत्र्यांच्या मनातील विद्वत्तापूजकता, विद्वत्तेसमोर नतमस्तक होण्याची वृत्ती, आदराची भावना, स्नेहभाव, याबरोबरच अत्र्यांच्या व्यासंगी, रसिक व अभ्यासू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. त्याचप्रकारे विद्वजनांचे तोंडभर कौतुक करताना मतभेदांचीही प्रांजळ कबुलीही ते देतात. प्रसंगी व्यक्तिगत जीवनातील बाबींवरही भाष्य करुन मूल्यमापन करतात. विद्वत्ता, व्यासंग, संशोधन, यावर वैशिष्ट्यपूर्ण भाष्य करतात. यावरुन अत्र्यांचे अनुभव क्षेत्र किती अफाट व विशाल होते याची कल्पना येते. त्या त्या विद्वजनांच्या विद्वत्तेवर व कार्यावर भाष्य करताना ते त्या व्यक्तिमत्त्वाचा विवेचक शोध घेताना दिसतात. व्यक्तीशी अत्र्यांचा जसा संबंध आहे त्यानुसार व्यक्तीच्या चारित्र्यापासून वैचित्र्यापर्यंत ते भाष्य करतात. उदा. चापेकरांच्या विद्वत्तेबद्दल नितांत आदर व्यक्त करुन त्यांच्या विचारातला फोलपणा दाखवताना पुराव्यासह दाखला देऊन म्हणतात, "वेदांतापासून तो समाजवादापर्यंत प्रत्येक विषयावर त्यांनी मौलिक विचार केला होता. तथापि एवढे असूनही त्यांचे काही विचार कधीकधी चमत्कारिक असत, की ते पटण्याची तर गोष्ट दूरच, पण ते ऐकून सर्वसामान्य माणसाला धक्का बसल्याखेरीज राहात नसे. उदाहरणार्थ, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी 'मुंबई' ही महाराष्ट्राची नाही असे त्यांनी आपले मत प्रकट केले. शिवाजी महाराजांपेक्षा पहिले बाजीराव मोठे होते असे ते एकदा म्हणाले".[9] किंवा शेजवलकर स्त्रीलंपट होते

असे धाडसी विधान करायलाही ते मागेपुढे पाहात नाहीत. यावरुन त्यांचा विद्‌वत्ता पूजकतेबरोबरच रोखठोक व परखडपणाही दिसून येतो. कोणत्याही बाबतीत ते अंधविश्वास ठेवत नाहीत. विद्‌वानांच्या खाजगी जीवनातील वाभाडे काढताना त्यांची लेखणी कमालीची तिखट बनते. ते जसे नम्र अभिवादन करतात तसे घणाघाती प्रहारही करतात. ते व्यक्तीच्या कार्याचा गौरव करतात तसे ढोंगाचे, वैचित्र्याचे आणि विक्षिप्तपणाचे ओरखाडेही काढतात. भावजीवनावर प्रकाश टाकतात आणि स्वभावाच्या वैशिष्टयपूर्ण छटाही टिपतात. एकंदरीत व्यक्तित्त्वाच्या प्रदीर्घ चिंतनाशिवाय व चौफेर दृष्टीशिवाय हे शक्य नाही ही गोष्ट मान्य करावीच लागेल. अत्र्यांच्या बहुरंगी चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वा मुळेच हे त्यांना शक्य झाले आहे. त्यांचे विद्‌वत्ता व व्यासंग यासमोर नतमस्तक होणारे व्यक्तिमत्त्व बहुतांशी मृत्युलेखांमधून प्रत्ययास येते. तसेच त्यांच्यातील टीकाकाराचेही रास्त दर्शन होते.

**6) वृत्तपत्र क्षेत्राशी संबधित मृत्युलेख –**

अत्र्यांचा व्यक्तींवर व्यक्तिचित्र / मृत्युलेख लिहिण्यात हातखंडा होताच पण 'महाराष्ट्राचा ज्ञानप्रकाश गेला' हा 'ज्ञानप्रकाश' पत्राच्या निर्वाणावर लिहिलेला मृत्युलेखही यशस्वी झाला आहे. वृत्तपत्र हा समाजमनाशी जोडलेला एक दुवा असतो. या दृष्टीने वृत्तपत्राचे समाजजीवनाशी महत्त्वपूर्ण नाते असते. अत्र्यांनी या लेखात 'ज्ञानप्रकाश' च्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा धावता आढावा घेऊन ज्ञानप्रकाश बंद पडल्याबद्‌दल शोक व्यक्त केला आहे. एखाद्या घनिष्ट संबंध असणाऱ्या व्यक्तीवर जेवढे प्रेम असावे तसे अत्र्यांचे 'ज्ञानप्रकाश'वरील प्रेम दिसून येते. हा जरी आढावा असला तरी त्याचे स्वरुप केवळ आढावा घेण्याचे राहात नाही तर अत्र्यांच्या संशोधक व संवेदनशील लेखणीचा स्पर्श ह्या लेखांस झाला आहे. लेखनात जागोजागी कित्येक तत्कालीन सामाजिक, राजकीय व काळाचे संदर्भ आल्याने हा लेख यशस्वी झाला आहे. त्याचप्रमाणे 'ज्ञानप्रकाश' पत्राचे माजी संपादक काका लिमये यांच्यावरील 'न विचारता गेलेले काका' आणि 'दुष्ट लोकांनी काकांना मारले हो' ह्या दोन मृत्युलेखांमधून काकांचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. 'न विचारता गेलेले काका' या लेखाचे स्वरुप आठवणीवजा असून त्याद्वारेच काकांचे व्यक्तिचित्र व स्वभावचित्र साकारले आहे. काकांचे नाटयप्रेम, व्यासंग, त्यांच्यातील मुरलेला पत्रकार, समाजकार्याची हौस, इतरांना मदत करण्याची वृत्ती यांचे अत्रे सोदाहरण दर्शन घडवतात. काका जेव्हा अत्र्यांना भेटायला येत तेंव्हा रात्री उशिरापर्यंत दोघांच्या गप्पा रंगत आणि दुसऱ्या दिवशी अत्रे थांबवून घेतील म्हणून सकाळी लवकर उठून ते निघून जात. शेवटच्या भेटीतही ते तसेच निघून गेले. म्हणून त्यांच्यावरील मृत्युलेखास 'न विचारता गेलेले काका'

हा मथळा औचित्यपूर्ण व समर्पक वाटतो. ह्या आठवणी सांगताना अत्र्यांच्या संवेदनाशिलतेचे तर प्रत्यंतर येतेच पण अत्र्यांच्या मनातील काकांबद्दलच्या नितांत आदर, भक्ती, स्नेह, जिव्हाळा, अभिमान, कृतज्ञता, याचे दर्शन घडते. यावरून अत्र्यांचे काकांच्या व्यक्तिमत्वाचे सूक्ष्म चिंतनही अनुभवास येते. 'दुष्ट लोकांनी काकांना मारले हो,' ह्या काकांसाहेबावरील दुसऱ्या मृत्युलेखाचे स्वरूप पहिल्या मृत्युलेखापेक्षा निराळे आहे. पहिल्या मृत्युलेखात व्यक्तित्व दर्शनावर व स्वभावचित्रणावर भर आहे. तर दुसऱ्या लेखात अत्र्यांमधील धीट पत्रकाराचे दर्शन घडते. काकासाहेबांवर भारत सेवक समाजाने वेळोवेळी कसा अन्याय केला व त्यांच्यावर झालेल्या पक्षाघातास व पर्यायाने त्यांच्या मृत्युस अप्रक्षपणे भारत सेवक समाजात कसा जबाबदार आहे हे घणघाती प्रहार करून व प्रसंगी रोखठोक भूमिका घेऊन अत्र्यानी सांगितले आहे.

'केसरी' व 'मराठा' या पत्रांचे माजी संपादक बाबुराव गोखले यांच्यावरील मृतयुलेखात अत्र्यांनी व्यक्तिगत हळहळ व्यक्त करून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर भाष्य केले आहे. तसेच 'कारूण्याचा विनोदी शहिर' हा अत्र्यांच्या 'नवयुग' साप्ताहिकाचे सहकारी विनोदी लेखक दत्तू बांदेकर यांच्यावरील मृत्युलेखात ते बांदेकरांच्या विनोदामामगील कारूण्याचा विवेकच शोध घेतात. जाता जाता बांदेकरांचे वाड्.मयीन चरित्र व वाड्.मयीन शोध घेतात. तसेच बांदेकरांचे वाड्.मयीन चरित्र व वाड्.मयी गुणवैशिष्टयेही ते नोंदवतात.वसंत लाडोबा म्हापणकर हे अत्र्यांना समकालीन होराभूषण त्यांच्या भविष्य कथनावर अत्र्यांचा कधीच विश्वास बसला नाही. पण त्यांच्या भविष्यलेखनाच्या वाड्.मयीन शैलीवर ते बेहद्द खूष आहेत. त्यांचा खरा पिंड भविष्यवेत्याचा नसून साहित्यिकाचा होता हे अनेक उदाहरणांनी ते सांगतात. ह्या लेखात अत्र्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाबरोबरच आगळयावेगळया वाड्.मयीन स्नेहभावाचेही दर्शन होते.

आचार्य अत्रे स्वतः पत्रकार असल्याने पत्रव्यवसायाशी संबंधित व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा त्यांना जवळून परिचय आहेच. पण त्याबरोबरीने सूक्ष्म निरीक्षण, अभ्यास व चिंतनही आहे. पत्रकाराच्या भूमिकेतून लेखन करताना ते ज्या व्यक्तीवर मृत्युलेख लिहितात तिला न्याय देतात. तिच्या जीवनाचे चोख मूल्यमापन करुन ती व्यक्ती शब्दरुप करतात. जिथे कृतज्ञता व्यक्त करायला हवी तिथे कमालीचे नम्र होतात आणि जिथे प्रहार करायचा तिथे कमालीचे तिखट होवून झोंबतात. त्यामुळे अत्र्यांनी जसे गुणी जनांना गोंजारले तसे दुर्जनांना ओरखाडलेदेखील. प्रसंगी एकाच व्यक्तीच्या सद्गुणदुर्गुणांच्या बेरीज वजाबाकीचीही अत्र्यांनी चोख गणिते केली.

7) **वाङ्.मयीन क्षेत्रातील व्यक्तींना श्रद्धांजली –**

वाङ्.मयीन क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्रे त्या व्यक्तीशी असलेल्या संबंधानुसार व्यक्तिगत आठवणी, वाङ्.मयीन विशेष, वाङ्.मय लेखनामागील प्रवृत्ती यांचा शोध घेतात. 'कमळा' काव्याचा कलावंत गेला. हा कवी बी यांच्यावरील मृत्युलेख त्यांनी आदराच्या व रसिकतेच्या भूमिकेतून लिहिला आहे. कवी 'बीं' च्या 'फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाला अत्र्यांनी लिहिलेली प्रस्तावना चांगली गाजलीतरीदेखील स्वतःकडे अत्यंत नम्रपणा घेऊन ते लिहितात, "स्फूर्तीचा विषय अलौकिक असला म्हणजे सामान्य माणसाच्या हातूनही कधी कधी असामान्य गोष्टी घडतात."[10] 'बीं' च्या व्यक्तिमत्त्व दर्शनापेक्षा त्यांच्या वैचारिक व काव्यात्म विकासावरच ते भर देतात. सुप्रसिद्ध कथाकादंबरीकार 'वि. सी. गुर्जर' यांच्यावरील मृत्युलेखातही त्यांच्या वाङ्.मयीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय करुन देत असताना त्यांच्या वाङ्.मयनिर्मिती मागील प्रेरणांचा शोध घेतला आहे. 'विनोद चिंतामणी' या चि. वि. जोशींवरील मृत्युलेखात त्यांच्या विनोदाचे वेगळेपण सांगताना अत्रे एकंदरीत मराठी विनोदी वाङ्.मयाचा आढावा घेऊन स्वतःकडे कमीपणा घेतात. तसेच त्यांच्या काही मर्यादांवरही भाष्य करतात. त्यांच्याशी असणा–या आपल्या वैयक्तिक मतभेदांची ते प्रांजळपणे कबुली देतात. मात्र त्यांच्याबद्दलचा अनादर मात्र व्यक्त करीत नाहीत. मतभेद सांगतानादेखील त्यांची भाषा अतिशय सरळ आहे. 'य. गो. जोशींवरील' 'यशवंत गोपाळ जोशी' ह्या मृत्युलेखात य. गों. च्या व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म निरीक्षण आले असून त्यांच्या वाङ्.मयीन कर्तृत्वाची अत्रे मुक्त कंठाने स्तुती करताना दिसतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रगटन त्यांच्या वाङ्.मयात कसे होते याचाही त्यांनी शोध घेतला आहे. तसेच 'भीमराव खंडेराव कोरान्ने' ह्या समाजसेवेच्या वृत्तीच्या साहित्यिकाचे अत्रे स्वतःवरील ऋण नम्रपणे व्यक्त करतात. त्यांच्या स्वभावातील सोज्वळता, सेवाभावी वृत्ती, साहित्याचे वेड, व्यक्त करुन ह्या साधूवृत्तीच्या साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व दर्शन घडवतात. महाराष्ट्रातील नामवंत मुद्रक व प्रकाशक 'मंगेशराव कुलकर्णी' यांच्यावरील मृत्युलेख अत्र्यांनी त्यांच्याबद्दलच्या व्यक्तिगत आंतरिक जिव्हाळयाच्या भावनेतून लिहिला आहे. त्यांचे कर्तृत्व आणि भावजीवन यांचा सुरेख संगम ह्या लेखात झाला आहे. त्यांच्या सहवासातील व्यक्तिगत आठवणींमधून अत्र्यांच्या मनातील मंगेशरावांबद्दलच्या अंतस्थ सूराची जाणीव होते. कमालीचे भावगांभीर्य ह्या लेखास प्राप्त झाले असून मंगेशरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे पारदर्शी दर्शन घडून जाते.

वाङ्.मयीन क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांचा व्यासंग, रसिकता, वाङ्.मयविषयीची चिकित्सा तर दिसून येते, त्याचबरोबरीने बहुतेक लेख आंतरिक जिव्हाळयाच्या

भूमिकेतून लिहिले असल्याने त्यात भावोत्कटता आली असून स्वाभाविकपणे लेखांची उंची वाढली आहे. अत्रे स्वतः अष्टपैलू साहित्यिक असूनही इतर साहित्यिकांना साहित्याशी स्वतःच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची तुलना करुन स्वतःकडे नम्रपणे कमीपणा घेऊन इतरांना मोठेपणा देतात. इतर साहित्यिकांच्या साहित्याचाही अत्र्यांचा दांडगा व्यासंग या लेखांमधून दिसून येतो.

**8) राजकीय क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख –**

अत्र्यांची पत्रकारिता निर्भिड तर आहेच पण तिची वृत्ती वाङ्.मयीन आहे. वृत्तपत्रात वाङ्.मय नसल्याने त्यांना वृत्तपत्रे आवडत नसत पण अच्युतरावांच्या 'संदेश' ने अत्र्यांचा हा समज दूर केला. "वाङ्.मयाच्या मधुर पाकात राजकारण 'तळून' ते वाचकांना द्यावयाचे, हे अच्युतरावांच्या वृत्तपत्राचे वैशिष्टय होते. अच्युतरावांच्या त्या शैलीचा माझ्या मनावर फार परिणाम झाला."[11] असा आपल्या शैलीवर अच्युतरावांच्या झालेल्या परिणाम ते निर्वाळा देतात. या भूमिकेतूनच त्यांनी राजकारण वाङ्.मयाच्या मधुर पाकात तळले आहे. ते राजकारण्यांच्या कार्याचे जसे कौतुक करतात तसेच त्यांच्या चुकांचेही दिग्दर्शन करतात. ते फक्त शब्दांची दिवाळी करीत नाहीत तर त्यासोबत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची दीपमाळ'ही प्रज्वलीत करतात.

'केशवराव जेधे' व 'शंकरराव मोरे' या राजकीय क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख एकाच अनुभूतीतून लिहिले आहेत. सत्तेच्या राजकारणातील दोघांच्याही संन्यस्त वृत्तीचा ते गवगवा करतात. जेध्यांनी पुण्याच्या सार्वजनिक जीवनातील ब्राह्मणी वर्चस्वाच्या मक्तेदारीविरुद्ध दिलेल्या झुंजार लढयातून त्यांच्या मनातील बहुजन समाजाच्या तळमळीची तुलना ते कर्मवीर भाऊराव पाटलांशी करतात. जेध्यांच्या राजकारणातील निरलस व संन्यस्त व्यक्तिमत्त्वाचेही दर्शन घडवतात. 'शंकरराव मोरे' यांच्यावरील मृत्युलेखातही अत्र्यांच्या मनातील मो–याविषयींचा आंतरिक जिव्हाळा व तात्त्विक विरोधही व्यक्त झाला आहे. त्यांच्या विद्वत्तेचे, व्यासंगाचे, निर्मळ मनाचे, प्रेमळ स्वभावाचे कौतुक करीत दोषांचे दिग्दर्शन करतात। मात्र दोष दाखवण्यापूर्वी त्यांचा मोठेपणा सांगायला ते विसरत नाहीत. ते अत्र्यांच्या शैलीचे वैशिष्टय दिसते. "शंकरराव मोरे हे केवळ महाराष्ट्राचे मुख्यप्रधान झाले नसते तर ते भारताचे पंतप्रधान झाले असते पण आपल्या असंयमी तोंडाळपणाने त्यांनी आपल्या आयुष्याचे वाटोळे करुन घेतले."[12] असे आधी अघळपघळ विधान करुन पुढे दोषांचे दिग्दर्शन करण्यात अत्र्यांच्या शैलीचे कौशल्य दिसून येते. 'भाऊसाहेब हिरे' यांच्याविषयीचा रागलोभ त्यांच्यावरील मृत्युलेखात व्यक्त झाला असून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलच्या निष्ठेबरोबरच काही वैयक्तिक व राजकीय मतभेदही व्यक्त झाले आहेत. ते त्यांची परखडपणे निंदानालस्तीही करतात

तरीदेखील त्यांच्या त्यागाबद्‌दल आदर व्यक्त करतात. 'अरेरे ! बर्वे गेले !' हा बर्व्यांवरील मृत्युलेख म्हणजे अत्र्यांचा भावोत्कट उद्‌गार होय. अत्र्यांची व्यक्तिपूजकता व आत्मीयता यांचे दर्शन याही मृत्युलेखात दिसते. तसे पाहिले तर बर्वे अत्र्यांचे राजकीय विरोधक असूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील निर्मळपणा, सभ्यता, सौजन्य त्यांना भावले आहे. 'मा. स. कन्नमवार' यांच्यावर अत्रे असा मृत्युलेख लिहितात यासंबंधी त्यावेळी सर्वांचेचे डोळे 'मराठा' कडे लागले होते. कारण कन्नमवार हे अत्र्यांचे राजकीय विरोधक असल्याने व कन्नमवारांशी अत्र्यांचा तात्त्विक विरोध असल्याने निर्भिड पत्रकाराच्या भूमिकेतून अत्र्यांनी त्यांना आपल्या वृत्तपत्रातून थटट्‌चा व व्यंगचित्राचा विषय बनवले होते. मात्र त्यांच्यावरील मृत्युलेख त्यांनी कौशल्यपूर्ण रीतीने लिहून त्यांच्या राजकीय व वैयक्तिक जीवनातील ब-यावाईट बाबींचे दर्शन घडवले आहे. ते त्यांचे अनाठायी गुणगानही करीत नाहीत आणि टीकादेखील बिनबुडाची करीत नाहीत.

भारतीय पातळीवरील गाजलेले गृहमंत्री 'के. सी. पंत' यांच्यावरील 'पंत गेले' ह्या मृत्युलेखात अत्र्यांनी पंताच्या प्रचंड व्यक्तिमत्त्वाचे व जबाबदा-यांचे दर्शन घडवले आहे. तसेच 'डॉ. राम मनोहर लोहीया,' यांच्यावरील 'अरेरे ! डॉ. लोहिया गेले !', डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यावरील 'राजेंद्रांचे स्वर्गारोहण' ह्या लेखांमधून त्या त्या व्यक्तींच्या नीतिमान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनव्यापी आढावा घेतला आहे. राजेंद्र बाबूंच्या व्यक्तिमत्त्वाचे, विचारांचे व स्वभावाचे अत्र्यांचे प्रदीर्घ चिंतन दिसून येते.

'भाषाप्रभू चर्चिल' आणि 'विश्वाची शोककथा' हे दोन मृत्युलेख आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकीय व्यक्ती इंग्लडचे पंतप्रधान 'चर्चिल' आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष 'केनेडी' यांच्यावरील आहेत. 'भाषाप्रभू चर्चिल' ह्या चर्चिलवरील मृत्युलेखातून चर्चिलच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू अत्र्यांना भावल्याचे प्रत्ययास येते. चर्चिलच्या जीवनेतिहासाचा हा विवेचक शोध तर आहेच. पण त्याच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंपैकी त्याच्या भाषाप्रभुत्त्वावर अत्रे जास्त फिदा आहेत. 'शेक्सपिअरनंतर इंग्रजी भाषेवर जास्तीत जास्त संस्कार जर कोणी केले असतील तर ते चर्चिलने असे मानले जातें."[13] असे त्याच्या भाषाप्रभुत्वाबद्‌दल ते गौरवपूर्ण उद्‌गार काढतात. त्याच्या जीवनातील अनेक प्रसंगांच्या अनुषंगाने त्याचे व्यक्तिमत्त्व ते उभे करतात. चर्चिलच्या व्यक्तिमत्त्वाशी काही भारतीय नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांची तुलना करुन ते चर्चिलला श्रेष्ठत्व देतात. या लेखात आशयाचा सूक्ष्मपणा असून स्वाभाविकपणे मधूनमधून इंग्रजी सुभाषिते आली आहेत. मार्मिकता, काही अंशी खवचटपणा, भाषेचा उठावदारपणा, राजकीय संदर्भ याबरोबर काही ठिकाणी भाषेस हसरेपणाही प्राप्त झाला आहे. लेखाचे स्वरुप 'व्यक्तिवैशिष्ट्यपर' आहे. 'विश्वाची शोककथा' या

जॉन केनेडी यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांनी केनेडींच्या जागतिक राजकारणातील शांतीप्रिय व्यक्तिमत्त्वाचा परिचय करुन देऊन त्यांच्या हत्येमागील कारणमांसाही केली आहे. अमेरिकन राजकारणावर भाष्य करीत असताना ते स्वतःची काही मतेही नोंदवत जातात. 'भाषाप्रभू चर्चिल' हा लेख जसा अप्रतिम जमला आहे तसा केनेडीवरील लेख जमला नाही. तो मोघम वाटतो.

अत्र्यांनी लिहिलेले राजकीय व्यक्तींवरील मृत्युलेख केवळ जंत्री देणारे नसून राजकारण्यांच्या राजकीय, सामाजिक व व्यक्तिगत जीवनावरील अत्र्यांचे हे तेजस भाष्य होय. राजकारण्यांची ते केवळ आरती ओवाळत नाहीत, अनाठायी गौरव करीत नाहीत तर 'इष्ट असेल तेच बोलणार आणि अनिष्ट बाबींवर प्रहार करणार' हा त्यांचा बाणा आहे. या भूमिकेतूनच ते व्यक्तीचे कार्य तिच्याशी आपला असणारा राजकीय, तात्त्विक विरोध किंवा मतभेद यांचीही प्रांजळ कबूली देतात. याचे कारण म्हणजे अत्र्यांचा राजकारण, समाजकारण, पत्रकारिता अशा अनेक बाबींशी संबंध आल्याने अनेक व्यक्तींशी त्यांचे बरेवाईट संबंध आहेत. मात्र ते जरी मतभेदांचा प्रांजळ उल्लेख करीत असले तरीही ते सांगण्याचे अत्र्यांचे म्हणून एक खास कौशल्य आहे. त्यामुळे आपण नकळतपणे अत्र्यांच्या बाजूला झुकतो.

**9) सामाजिक प्रतिष्ठित व विचारवंतांवरील मृत्युलेख –**

समाजातील प्रतिष्ठित व विचारवंतावरील मृत्युलेखांमधून व्यक्तीच्या वैचारिक, सामाजिक, राजकीय विचारसरणीचा व कार्याचा परिचय होतोच पण तत्कालीन जीवनप्रवाहाचे व राजकीय प्रणालींचेही दर्शन घडते. जुन्या पिढीतील कित्येक महनीय व्यक्तींच्या वैचारिक व व्यक्तिगत व्यक्तिमत्त्वांची ओळख नव्या पिढीला होते. 'कै. पुरुषोत्तम त्रिकमदास' ह्या मृत्युलेखांत अत्र्यांनी त्रिकमदासांमधील राजकीय विचारवंताचा परिचय करुन दिला आहे. या अनुषंगाने त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनातील आठवणींच्या माध्यमातून त्रिकमदासांचे स्वभावचित्रही उभे केले आहे. 'वामनराव नातू' हे भारतीय पातळीवरील अर्थशास्त्रज्ञ. त्यांचे व अत्र्यांचे संबंध स्नेहाचे असल्याने त्यांच्यावरील मृत्युलेखाचे लेखन स्नेहभावाच्या भूमिकेतून झाले आहे. त्यांच्या जीवनातील विविध स्तरांवर भाष्य करुन देशाच्या अर्थशास्त्राच्या दृष्टीने त्यांच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचे मूल्यमापनही केले आहे. भाषेत हळवेपणा आला असून स्वाभाविक सुभाषितेही निर्माण झाली आहेत.

'न्यायमूर्ती तेंडोलकर' व 'न्यायमूर्ती बावडेकर' ह्या दोन न्यायाधीशांवरील मृत्युलेखांमध्ये दोघांच्याही न्यायक्षेत्रातील कार्याचा उचित गौरव करुन वैयक्तिक भावविवशता व्यक्त झाली आहे. 'न्यायमूर्ती तेंडोलकरांच्या न्यायाधिश म्हणून व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवत असताना त्यांच्या

भावजीवनावरही प्रकाश टाकला आहे. त्याचप्रमाणे तेंडोलकरांच्या न्यायनिष्ठेसंबंधी व बाणेदार सडेतोड वर्तनासबंधी भाष्य करीत असताना अत्र्यांच्या मनातील काँग्रेस राजवटीबद्दलची तीव्र नापसंती तेवढयाच तीव्र शब्दांमधून व्यक्त होताना दिसते. दारुबंदीच्या कायद्याविरुद्ध काही आक्षेप उपस्थित झाले असता तेंडोलकरांनी सरकारी वकिलांची कशी भंबेरी उडवली हे सांगताना अत्रे म्हणतात, "त्याने काँग्रेस सरकारच्या डोक्यावरची पगडी शाबूत राहिली, पण त्याचे धोतर मात्र हिसकावून घेतले. दारुबंदीच्या कायद्याची इतकी फजिती कोणी केली नसेल"[14] यावरुन अत्रे दारुबंदीच्या कायद्याचे विरोधक होते हे तर स्पष्टच होते पण काँग्रेसच्या मनमानी निर्णयांचीही अत्र्यांच्या मनातील नापसंती दिसून येते. 'न्यायमूर्ती बावडेकर' यांच्यावरील लेखात बावडेकरांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूमुळे लेखास राजकीय रंग आला आहे. शासनावर निर्भयपणे ताशेरे ओढून बावडेकरांच्या मृत्यूबद्दल अत्रे अनेक तर्कवितर्क मांडतात. येथे लेखाचा भाग तर्कवितर्कात खर्ची पडल्याने व्यक्तित्त्व दर्शनाकडे दुर्लक्ष झाले आहे.

'देशभक्त जयकर' उपेक्षित देशभक्ताचे निधन' आणि 'देशभक्त भोपकटकर' ह्या देशभक्त 'बाबासाहेब जयकर', 'तात्यासाहेब घारपुरे' व 'आण्णासाहेब भोपटकर' या तीन देशभक्तांवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांनी तिघांच्याही निःसीम देशभक्तीचे दाखले देऊन त्यांच्या देशभक्तीपर विचारांचे संदर्भ दिले आहेत. तात्यासाहेब घारपुरे यांच्या देशभक्तीची काँग्रेस सरकारने केलेली उपेक्षा सांगताना अत्रे नामोल्लेखासह **काँग्रेसी पुढा-यांना** फडतूस, संधीसाधू, हिणकस अशी विशेषणे लावतात. भोपटकरांवरील मृत्युलेखात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील पैलूंवर अधिक प्रकाश टाकला आहे व समकालीन जीवनप्रवाहाचेही दर्शन घडवले आहे.

'सज्जन सर्जन', 'डॉ. बालिगा,' आणि 'प्रसूती प्रभाकरांचा अंत' या वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. डॉ. बाबुराव फडके, डॉ. बालिगा आणि डॉ. अण्णासाहेब पुरंदरे ह्या तीनही व्यक्ती समाजसेवक म्हणून महान असल्याने त्यांच्यावरील मृत्युलेख अत्र्यांनी आत्मियतेने लिहिले आहेत. ह्या व्यक्तींच्या वैद्यकीय क्षेत्रातील निरलस सेवेचा अत्रे यथोचित गौरव करतात. डॉ. बालिका यांच्यावरील मृत्युलेखातही त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील अस्तित्वाचे आणि व्यक्तित्वाचे गुणगान करताना त्यांच्या व्यक्तिमत्वास सहजपणे मोठेपणा प्राप्त होतो. त्यांच्या स्वभावचित्रणास दुय्यम स्थान असून त्यांच्या कार्यातून त्यांच्या व्यक्तित्त्वाचे दर्शन घडवले आहे. 'प्रसुती प्रभाकरचा अंत' हा डॉ. अण्णासाहेब पुरंदरे यांच्यावरील मृत्युलेख म्हणजे डॉक्टरांच्या तेजस्वी आणि तपस्वी व्यक्तिमत्वाचा घेतलेला शोध होय.

'अर्धशतकाचा माझा मित्र गेला' हा डॉ. दिनकर आप्पाजी पुरंदरे यांच्यावरील मृत्युलेख अत्र्यांनी मैत्र्यभावातून लिहिला आहे. डॉ. पुरंदरे अत्र्यांचे बालमित्र असल्याने अत्र्यांचे त्यांच्या स्वभावाचे सूक्ष्म चिंतन आहे. त्यांच्या सहवासातील काही आठवणी सांगताना भाषा कधी हसरी तर कधी गंभीर होते. लेखाच्या शेवटी अत्रे जीवनविषयक चिंतनही करतात. ग्वाल्हेरचे महाराज जिवाजीराव यांच्यावरील 'अखेरचा मुजरा' ह्या मृत्युलेखात अत्र्यांनी स्नेहभावाच्या भूमिकेतून जिवाजीरावांचे स्वभावचित्रण केले आहे. हे स्वभावचित्रण रसिकांच्या मनात दीर्घकाळ रेंगाळत राहते. इतिहाससंशोधक दत्तो वामन पोतदार यांचे बंधू 'दामूआण्णा पोतदार' यांच्यावरील मृत्युलेखात पुण्याच्या सार्वजनिक जीवनातील त्यांच्या झंझावती व्यक्तिमत्त्वाचा परिचय करुन देऊन त्या अनुषंगाने दत्तो वामन पोतदार यांच्या ज्ञानसाधनेतील अपरंपार कष्टाचा उल्लेख आला आहे.

सामाजिक प्रतिष्ठित व विचारवंतावरील मृत्युलेखांमधून अत्र्यांनी त्या त्या व्यक्तींशी असणा-या संबंधानुसार त्यांच्या सामाजिक, वैचारिक व व्यक्तिगत व्यक्तिमत्त्वांचा परिचय करुन दिला आहे.

**10) सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेख –**

सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमध्ये नाटय, चित्रपट, संगीतकार, गायक इ. क्षेत्रामधील व्यक्तींचा समावेश आहे. नाटय क्षेत्रातील व्यक्तींमध्ये मामा वरेरकर, गणपतराव बोडस, नागेश जोशी, दामूअणा जोशी या व्यक्तींवरील मृत्युलेखांचा समावेश आहे. 'मामा गेले हो' हा श्रेष्ठ नाटककार मामा वरेरकर यांच्यावरील मृत्युलेख अत्र्यांनी आपल्या खास शैलीत खुलवला आहे. प्रत्यक्ष जीवनात काही बाबतीत अत्र्यांचे व मामांचे मतभेद होते. पण एखाद्या व्यक्तीशी जरी मतभेद असले तरी त्या मतभेदांकडे मतभेदांपुरतेच पाहण्याची व गुणांची प्रशंसा करण्याची अत्र्यांची वृत्ती आहे. त्यामुळे ते व्यक्तीचे गुणगान करीत करीत हळूच आपले त्या व्यक्तीशी असणारे मतभेद खुमासदारपणे सांगून जातात. मामांविषयी ते म्हणतात, "मामा खोडकर होते पण चिडखोर नव्हते खवचट होते पण हालकट नव्हते".[15] यावरुन अत्र्यांच्या गुणग्राहकतेचे प्रत्यंतर होते. त्याचप्रमाणे मामांच्या वाड्.मयीन व्यक्तिमत्त्वाचेही ते दर्शन घडवतात. 'गणपतराव बोडस' हे अत्र्यांचे वाड्.मयीन गुरु राम गणेश गडकरी यांचे मित्र असल्याने त्यांच्या विषयीच्या आदराच्या भावनेने हा लेख लिहिला आहे. गणपतरावांच्या अभिनयाच्या मोठेपणाबरोबरच त्यांच्या फटकळपणावरही ते भाष्य करतात. बालमोहन नाटक, कंपनीतील तरुण नट नागेश जोशींचं अत्र्यांच्याच 'पाणिग्रहण' नाटकात काम करताना अकस्मात निधन झाल्यानं त्यांनी अतिशय दुःखद अंतःकरणाने त्यांच्यावरील मृत्युलेख लिहून त्यांच्या वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती केली आहे. 'नटश्रेष्ठ दामूअण्णा जोशी' ह्या मृत्युलेखात अत्र्यांचा दामूअण्णांशी असलेला अंतस्थ, हृदयस्थ सूर जाणवतो. आपण नाटककार होण्यास

दामूआण्णाच कसे कारणीभूत झाले हे सांगताना अत्र्यांमधील स्वाभिमानी नाटककाराचे दर्शन घडते.

'गुणीदास गेले' हा संगीत क्षेत्रातील अग्रणी व्यक्तिमत्त्व जगन्नाथबुवा पुरोहित यांच्यावरील मृत्युलेख औपचारिक असला तरी त्यात उत्स्फूर्ततेतची जाणीव होते. संगीत क्षेत्रातील कोणाही जाणकाराचे समाधान व्हावे असे हे लेखन आहे. हा लेख लिहित असताना अत्र्यांनी जागोजागी केशवराव भोळयांच्या षडज गांधार या पुस्तकाचा आधार घेतला असला तरी गुणीदासांचे चित्रण सपाट न होता अनेकांगी झाले आहे. "बालगंधर्वाविषयी 'वुइथ ऑल दाय फॉल्टस' अशी अत्र्यांची भावना होती. पण त्यांच्या मृत्युने अत्र्यांचा गहिवर अनावर झाला नि त्यांनी सहका–याला मृत्युलेख लिहायला सांगितला."

अत्र्यांचे सहकारी र. गो. सरदेसाई यांनी हा लेख लिहल्याने या लेखास अत्रेय स्पर्श नाही. 'गंधर्वाचा गळा गेला' हा गोहरबाईवरील मृत्युलेख अत्र्यांनी अत्यंत हळवेपणाने लिहिला असून बालगंधर्व आणि गोहरबाई यांच्यातील नैतिक प्रेमसंबंधाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. हा लेख जरी गोहरबाईवर असला तरी अत्रे यानिमित्ताने बालगंधर्वांच्या नैतिक धर्माचे गुणगान करतात. येथे अत्रे व्यक्तीच्या भावजीवनावर प्रकाश टाकत टाकत कर्तृत्वावरही भाष्य करतात.

चित्रपट क्षेत्रातील 'मास्टर विनायक', 'बाबुराव पेंढारकर' यांच्यावरील मृत्युलेखांमध्ये चित्रपट कलावंत म्हणून अत्रे त्या त्या व्यक्तींचाउचित गौरव करतातच. त्याच बरोबरीने स्वभावविशेषांवरही भाष्य करतात. 'बालमनोवृत्तीचा मास्टर विनायक' हा लेख अभ्यासताना बालकवींच्या व्यक्तिमत्त्वाचीही आठवण होते. विनायकाच्या बालीशपणाबद्दल अत्रे म्हणतात 'विनायक वयाने वाढला पण वृत्तीने मूलच राहिला."[17] विनायकाच्या जीवनाचा आढावा घेत असताना ते जसे त्याचे सामर्थ्य सांगतात तसेच अपुरेपणाबद्दलही बोलतात. 'अरेरे, बाबुराव गेले' ह्या बाबुराव पेंढारकरांवरील मृत्युलेखात अत्र्यांचे व बाबुरावांचे संबंध स्नेहभावाचे असल्याने लेखास स्वाभाविकपणे भावविवशता प्राप्त झाली आहे. त्यांच्या वियोगाबद्दल अत्यंत करुणरम्यपणे ते म्हणतात 'आकाशातील तारकापुंजात बाबुराव पेंढारकर या तेजस्वी ता–याची भरती झाली आहे. त्यांच्या वियोग अश्रूंनी डबडबलेल्या आमच्या दुबळया डोळयांना मात्र तो नवा तारा दिसत नाही."[18] यावरुन त्यांच्या मनातील भावविवशतेचे प्रत्यंतर येते. 'नकलाकार भोंडे' यांच्यावरील मृत्युलेखात भोंडयाचा ते नकलाकार भोंडे यांच्यावरील मृत्युलेखात भोंडयाचा ते नकलाकार म्हणून उल्लेख न करता कलाकार म्हणून गौरव करतात. त्यांच्या नकलांचे वैशिष्टय सांगताना कलेची कलात्मक वैशिष्टये ते नोंदवतात. थोर पुरुषांचे व्यक्तिदर्शन हे जरी भोंडयाच्या नकलांच्या वैशिष्टय असले तरी त्यांच्या नकला व्यक्तिगत स्वरुपाच्या नसत. ते व्यक्तीची नक्कल व्यक्तिमत्वाची नक्कल करीत असत हे भोंडयाच्या व्यक्तिमत्त्वाचे निरीक्षण सूक्ष्म आहे. त्यामुळेच ते त्यांच्या नकलांचे वेगळेपण नोंदवू शकतात.

सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींवरील मृत्युलेखांमधून अत्र्यांनी व्यक्तीचे कलावंत म्हणून वेगळेपण तर दाखवलेच आहे. पण संबंधानसुार व्यक्तिबद्दलचा स्नेहभाव, भावनिक जिव्हाळा, मतभेद यांचेही दर्शन या लेखांमध्ये घडते. अत्रे ख-या अर्थाने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वास न्याय देतात.

10) धार्मिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तीवरील मृत्युलेख – 'हुंदके' या संग्रहात धार्मिक क्षेत्राशी व्यक्तींवरील तीन लेखांचा अंतर्भाव आहे. अत्र्यांचा समाजसेवक, राज्यकर्ते, विचारवंत, कलावंत, लेखक यांच्याशी ब-याच प्रमाणात संबंध आला. त्या तुलनेत धार्मिक, व्यक्तींशी आलेला संबंध जरी कमी असला तरी जिथे तिथे तो आला त्याचे यथोचित दर्शन त्यांनी लिहिलेल्या धार्मिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तींवरील मृत्युलेखांमध्ये दिसून येते.

संत गाडगेबाबांवरील 'तुकोबांचा अवतार' ह्या शीर्षकाच्या मृत्युलेखात शीर्षकातच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे औचित्यपूर्ण वर्णन दिसून येते. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले' हे तुकारामांनी सांगितलेले संतलक्षण गाडगेबाबांना तंतोतंत कसे लागू पडते हे अत्र्यांनी स्पष्ट केले आहे. मुस्लीम धर्मगुरु 'आगाखान' यांच्यावरील मृत्युलेखात आगाखानांचे जीवन म्हणजे एक अभूतपूर्वक चमत्कार कसा होता हे त्यांच्या जीवनातील बरेचसे दाखले देवून ते सांगतात. त्यांच्या जीवनेतिहासाचाहा विवेचक शोध होय. अत्रे एखाद्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रेमात पडले की, प्रसंगी अतिशयोक्ती स्वीकारुन ते त्या व्यक्तीचे गुणगान करतात. हे 'कै. बाबा प्रधान' यांच्यावरील मृत्युलेखात दिसून येते. त्यांच्या लेखनाचा व आध्यात्मिक साक्षात्काराचा आपणास कशा प्रकारे अनुभव आला याचे माहितीपर वर्णन अत्रे दैववादी दृष्टिकोनातून करताना दिसतात.

**'हुंदके' संग्रहातील मृत्युलेखांची वैशिष्टये :**

'हुंदके' या संग्रहातील मृत्युलेखांचा अभ्यास करीत असताना काही महत्वपूर्ण वैशिष्टये ध्यानात येतात. अत्र्यांच्या मृत्युलेखनामध्ये जणू काही दर्पणात प्रतिबिंब पडावे तसे व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचे आणि कर्तृत्वाचे प्रतिबिंब दिसते. त्यांचे व्यक्तिबद्दलचे पक्व चिंतन असल्याने व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे बारकाव्यांसह चित्रण त्यांच्या मृत्युलेख लेखनात येते. त्यांची भाषा कधी आलंकारिक काव्यात्म होते तर कधी साध्या सरळ भाषेतून ते व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या भावछटा फुलवत जातात. ते केवळ शब्दांची दिवाळी करीत नाहीत तर त्यासोबत व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची दीपमाळही प्रज्वलित करतात. भावजीवनावर प्रकाश टाकत टाकतच कर्तृत्वासंबंधीही बोलू लागतात. त्यामुळे ते चित्रण एकांगी न होता अनेकांगी होते. त्यातून अत्र्यांचा व्यक्तीशी असलेला अंतस्थ, हृदयस्थ सूर जाणवतो.

अत्र्यांचे बहुतेक मृत्युलेखांमधून व्यक्तीबद्दलचे चिंतन इतके गहन आहे की, या लेखनाम्धून एखाद्या अजाण वाचकालाही त्या त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचा जवळून परिचय होतो. हे मृत्युलेख म्हणजे अत्र्यांच्या व्यक्तीबद्दलच्या प्रदीर्घ चिंतनाचा, भावानुभूतीच्या रंगाचा, उदात्ततेचा, विनोदाचा व करुणरम्यतेचा परिपाक होय. या लेखांना जेंव्हा अत्र्यांच्या मनातील भावनेचा स्वाभाविक स्पर्श होतो. तेव्हा त्यात साहजिकच जिवंतपणा प्राप्त होतो. बहुतांशी मृत्युलेखांना हा भावनिक स्पर्श आहे. त्यामुळे हे मृत्युलेख म्हणजे व्यक्तीबद्दलची निव्वळ माहिती किंवा जंत्री वाटत नाहीत तर ते जिवंत वाटतात. हे लेखन अत्र्यांच्या व्यक्तिगत अनुभूतीचा भावोत्कट उद्गार होते. त्यात अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व मिसळल्याने लेखांना अत्र्यांच्या स्वभावाचा, शैलीचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा स्पर्श आहे.

या लेखांचे स्वरुप अग्रलेखांचे असल्याने हे लेख अभ्यासताना त्या त्या व्यक्तींच्या समकालीन जीवन प्रवाहांचेही स्वाभाविक दर्शन घडते. तसेच अत्रे व्यक्तीच्या फक्त व्यक्तिगत व्यक्तित्वाचे दर्शन घडवत नाहीत तर तिच्या सामाजिक, राजकीय, वैचारिक व्यक्तिमत्त्वाचेही दर्शन घडवतात. मात्र हे सारे करीत असताना अत्र्यांचे आत्मभान महत्त्वपूर्ण आहे. कोणत्याही प्रकारचा वावगेपणा या लेखनात नाही. उलट मानवी जीवनातील नेहमीच्या प्रसंगांनाही जेंव्हा अत्र्यांच्या चिंतनशीलतेचे जोड मिळते तेंव्हा ते प्रसंग अंतःकरणाला भिडणारे होतात. अत्र्यांना खरोखरच जीवनानुभवाची प्रगल्भ जाणीव आहे हे या लेखनातून स्पष्ट होते.

अत्रे लिखित मृत्युलेखांमध्ये तरल स्नेहार्द्रतेचा ओलावा आहे. कथात्मकता आहे. साहित्यक शैलीचा स्पर्श लाभलेले हे अग्रलेखवजा मृत्युलेख आहेत. हे लेखन जरी प्रसंगोपात झालेले असले तरी त्याचे मूल्य प्रासंगिक राहत नाही तर अत्र्यांनी शब्दात कोरलेल्या व्यक्तींच्या या वाङ्‌मयीन मूर्ती आहेत. सामाजिक व राजकीय घटनांचे तपशील आणि त्यासंबंधीचे अत्र्यांचे व्यक्तिगत विचार मत–मतांतरे या लेखांमधून आलेली आहेत. व्यक्तींच्या स्वभावाबद्दलची वैशिष्टयपूर्ण माहितीही या लेखनातून प्रत्ययास येते. या लेखनात सळसळते कारुण्य आहे, नर्म विनोद आहे, सच्च्या पत्रकाराच्या भूमिकेतून राजकारणावर व राजकारण्यांवर केलेले भाष्य आहे, व्यक्तिमत्त्वांचे रंगढंग आहेत, व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांना विशेषणे लावण्याची विशिष्ट शैली आहे, समकालीन जीवनप्रवाहांचे चित्रण आहे. एका अर्थाने मृत व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचा काही अंशी का होईना हा शोध आहे.

* वरील विवेचनाआधारे खालील निष्कर्ष निघतात.

1) 'हुंदके' मधील मृत्युलेखांचे लेखन सूक्ष्म अवलोकनातून झाले असून त्यामध्ये अत्र्यांच्या चिंतनशीलतेचे प्रत्यंतर येते.

2) हे लेखन एकतंत्री नाही. कथात्मकता, व्यक्तिचित्र, आठवणी या स्वरुपात हे लेखन झाले आहे.

3) अत्र्यांच्या व्यापक अनुभवविश्वाचे दर्शन मृत्युलेख अभ्यासताना होते. त्यांचा जनसंपर्क व लोकसंग्रह किती विशाल होता याची कल्पना येते.

4) अत्रे व्यक्तीचे टीकाकार आहेत तेवढेच गुणग्राहकही आहेत. याचेही प्रत्यंतर या लेखनामध्ये होते.

5) समर्पक शीर्षकांची योजना, मनाला चटका लावणारा प्रारंभ व शेवट, सुभाषितांची स्वाभाविक निर्मिती व वापर, व्यक्तिगत व सामाजिक संदर्भ, व्यक्तीच्या जीवनाचा विवेचक शोध ह्या साऱ्या बाबी त्यांच्या मृत्युलेख लेखनात येतात.

6) मृत्युलेखांच्या भाषेस प्रवाहीपणा व चित्रमयता प्राप्त झाली आहे. त्याचबरोबरीने या लेखनात काव्यात्मता व भावनिकतेचेही प्रत्यंतर येते.

7) व्यक्तीच्या जीवनाबरोबरच मनाचाही शोध घेणारे हे लेखन आहे.

8) जुन्या पिढीतील महनीय व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचे दर्शन नव्या पिढीला होण्याच्या दृष्टीने हे मृत्युलेख वाङ्मयीन मानदंड होत.

9) अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वावर असणारा निरनिराळया व्यक्तींचा प्रभाव या मृत्युलेखांमध्ये व्यक्त झाला आहे.

10) मृत्युलेख लेखन सर्व समावेशक असून सामान्य व्यक्तींपासून ते असामान्य व्यक्तींपर्यंत अनेक व्यक्ती मृत्युलेखांचे विषय झाल्या आहेत.

*****

## – तळटीपा –

1. प्र. के. अत्रे : 'हुंदके' द्वितीयावृत्ती : परचुरे, मुंबई : 1989 : पृष्ठ 367.
2. तत्रैव : पृष्ठ 369
3. तत्रैव : पृष्ठ 208
4. तत्रैव : पृष्ठ 175
5. तत्रैव : पृष्ठ 79
6. तत्रैव : पृष्ठ 79
7. तत्रैव : पृष्ठ 184
8. तत्रैव : पृष्ठ 93
9. तत्रैव : पृष्ठ 97
10. तत्रैव : पृष्ठ 55
11. प्र. के. अत्रे : '**मी कसा झालो**' पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 302, 303
12. प्र. के. अत्रे : 'हुंदके' : द्वितीयावृत्ती : परचुरे, मुंबई : 1989 : पृष्ठ 251
13. तत्रैव : पृष्ठ 303
14. तत्रैव : पृष्ठ 223
15. तत्रैव : पृष्ठ 89
16. तत्रैव : पृष्ठ 15
17. तत्रैव : पृष्ठ 155
18. तत्रैव : पृष्ठ 144

–x–